॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

**✻ सुविचार ✻**
प्रत्येक दिवस हा नवीन संधी घेऊन येतो, फक्त ती ओळखायची कला आत्मसात करा




अहिल्यानगर | मंगळवार, दि. २० मे २०२५ | वर्ष ६ वे | अंक ३८ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

## SPOT NEWS

### छगन भुजबळ मंत्रिपदाची शपथ घेणार

**● बीड** – माजी मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ उद्या मंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. राज्याच्या राजकारणात छगन भुजबळ गेल्या काही दिवसांपासून बॅक फूटवर आले होते. मंत्रिपद न मिळाल्याने छगन भुजबळ यांनी वारंवार आपली नाराजी व्यक्त केल्याचे बघायला मिळाले होते. परंतु आता भुजबळ यांचे राजकीय पुनर्वसन होताना दिसत आहे. राज्याच्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पार्श्वभूमीवर ओबीसी समाजाचा महत्त्वाचा चेहरा म्हणून छगन भुजबळ यांना मंत्रिपदाची संधी दिली जात असल्याची चर्चा आहे. राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी याबाबत महत्त्वाचे परिपत्रक जारी केले आहे. महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळाच्या सदस्यांचा शपथविधी समारंभ आयोजित केल्याची माहिती या परिपत्रकात जारी करण्यात आली. मुंबईत राजभवन येथे हा शपथविधी कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमाचे मोजक्याच जणांना निमंत्रण असणार असल्याचीदेखील माहिती समोर येत आहे.

### रिपाईं काढणार 'भारत जिंदाबाद' रॅली

**● पुणे** – भारतीय सैन्याने हाती घेतलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या यशाबद्दल रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या वतीने 'भारत जिंदाबाद' रॅली काढण्यात येणार असल्याचे आरपीआयचे अध्यक्ष व केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. आरपीआयच्या वतीने राज्यातील सर्व जिल्ह्याच्या ठिकाणी तसेच देशातील महत्त्वाच्या शहरांमध्ये 'भारत जिंदाबाद' रॅली आयोजित करण्यात येईल,जम्मू काश्मीर जोपर्यंत भारताच्या ताब्यात येत नाही तोपर्यंत लढाई सुरूच ठेवावी,अशी पक्षाची भूमिका असल्याचे आठवले यांनी स्पष्ट केले. दीर्घकाळ रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्याच्या आत पार पाडाव्या,असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर या निवडणूक प्रक्रियेला वेग आला आहे.या निवडणुका भाजप,शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि आरपीआय यांनी महायुती म्हणून एकत्रित लढवाव्या,अशी पक्षाची भूमिका आहे. महायुतीतील घटक पक्षाच्या प्रमुखांना भेटून आपण ही भूमिका मांडणार आहोत. या निवडणुकांमध्ये आपल्या पक्षाला योग्य प्रतिनिधित्व मिळावे,अशी देखील आग्रही मागणी आहे.

# राज्यात अवकाळीने २७ हजार हेक्टर क्षेत्र बाधित

## कृषीमंत्र्यांची माहिती | सर्वाधिक नुकसान अमरावती जिल्ह्यात

**● नाशिक | वीरभूमी–**
राज्यभरात अवकाळी पावसाने २७ हजार हेक्टर क्षेत्र बाधित झाल्याची माहिती कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली आहे. अमरावती जिल्ह्यात राज्यातील सर्वाधिक १३ हजार हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. तर नाशिकमध्ये ५ हजार ८०० हेक्टर क्षेत्र बाधित आहे. राज्यात फळ पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती माणिकराव कोकाटे यांनी दिली आहे.

राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज खरीप हंगाम आढावा बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी अधिका–यांना चांगलेच फटकरले आहे. बैठकीला येताना अपूर्ण माहिती असणा–या आणि गैरहजर असणा–या अधिका–यांवर कोकाटे संतापल्याचे पाहायला मिळाले. गैरहजर राहणा–या अधिका–यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश जेखील कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिले आहेत. त्याचबरोबर खरीप हंगामात कोणतेही अधिकारी रजेवर किंवा संपावर जाणार नाहीत, असा इशाराही माणिकराव कोकाटे यांनी दिला आहे.

राज्यात खतांचा मोठ्या प्रमाणांत बफर स्टॉक असल्याची माहितीही माणिकराव कोकाटे यांनी दिली आहे. खते आणि बियाणांचं लिंकिंग कोणी करणार नाही याच्या सक्त सूचना राज्यभरातील कृषी केंद्रांना दिल्या आहेत. बोगस बी बियाणे खते देणा–यावर गुन्हे दाखल केले जाणार असल्याचा इशारा देखील मामिकराव कोकाटे यांनी दिला आहे. येत्या काही दिवसात कृषी अधिका–यांच्या बदल्या केल्या जातील असेही ते म्हणाले.



जे अधिकारी जाणूनबुजून गैरहजर राहणार असतील याबाबत मुख्यमंत्र्यांच्या कानावर विषय टाकणार असल्याचे माणिकराव कोकाटे म्हणाले. आधी कळवणार नसतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल असेही कोकाटे म्हणाले. शासनाने आश्वासन दिल्यानंतरही जर कोणी संपावर जाणार असतील तर त्यांच्यावरही कारवाई केली जाणार आहे.

खरीप हंगामात कोणताही अधिकारी रजेवर किंवा संपावर जाणार नसल्याच्या सूचना माणिकराव कोकाटे यांनी दिल्या आहेत. संप पुकारून शेतकरी आणि सरकारला कोणीही वेठीस धरणार नाही, अन्यथा प्रशासकीय कारवाई केली जाईल असा इशारा कोकाटे यांनी दिला आहे. दोन दिवसांनी मुख्यमंत्रीच्या अध्यक्षतेखाली बैठक होणार आहे. त्यावेळेस कृषी विभाग तयार असल्याचे आश्वासन मी त्यांना देणार असल्याचे माणिकराव कोकाटे म्हणाले.

# माजी महापौर अभिषेक कळमकर यांच्यावर गुन्हा दाखल

**● अहिल्यानगर | वीरभूमी–**
माजी महापौर आणि शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर यांच्यावर आर्थिक कारणावरुन डांबून ठेवून मारहाण केल्याचा गुन्हा दाखल झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. रवींद्र रामराव शेळके यांच्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात मच्छिंद्र झेंडे, अभिषेक कळमकर, लालू उर्फ अभिषेक जगताप, तसेच एक महिलेसह अनोळखी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मागील आर्थिक कारणावरुन वेगवेगळ्या ठिकाणी डांबून ठेवून रवींद्र रामराव शेळके यांना मारहाण करून त्यांच्याकडून विविध स्टॅम्पवर बळजबरीने सह्या घेण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. रवींद्र रामराव शेळके हा माजी महापौर अभिषेक कळमकर यांच्याकडे दहा वर्षापासून चालक म्हणून कामाला होते. मात्र कळमकर यांच्याशी आर्थिक कारणावरुन वाद झाल्याने रवींद्र शेळके याने दोन वर्षापासून चालक म्हणून असलेली नोकरी सोडून दिली होती. सहा महिन्यापूव सुद्धा रवींद्र रामराव शेळके यांच्या अंगाराव गाडी घालून मारण्याचा प्रयत्न झाला असल्याचा आरोप शेळके यांनी केला असून या प्रकरणी त्यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात तक्रार केली असल्याचे सांगितले.

१२ मे रोजी रवींद्र रामराव शेळके यांचे नगर सोलापूर रोडवरून पांढऱ्या व रंगाच्या टोयाटो कंपनीच्या वाहनातून आलेल्या लोकांनी अपहरण करून त्यांना चिखली या ठिकाणी नेऊन मारहाण करण्यात आली. तसेच एका महिले बरोबर बळजबरीने फोटो काढून घेण्यात आले आणि त्यानंतर काही नोटरी आणि कागदपत्रांवर बळजबरीने सह्या घेतल्या असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. माजी महापौर अभिषेक कळमकर यांच्या पासून आपल्याला आणि कुटुंबाला धोका असल्याने शेळके यांनी केली संरक्षणाची मागणी केली आहे.

# हैदराबादचा विजय, लखनौ आऊट

## लखनौ स्पर्धेतून बाहेर, प्लेऑफसाठी मुंबई-दिल्लीत लढत

**● हैदराबाद | वीरभूमी–**
आयपीएलच्या ६१ व्या सामन्यात सनरायजर्स हैदराबादने लखनौ सुपर जायंट्सवर ६ विकेट्सने विजय मिळवला. लखनौने हैदराबादला विजयासाठी २०६ धावांचे आव्हान दिले होते. हैदराबादने हे आव्हान १० बॉलआधी आणि ४ विकेट्सच्या मोबदल्यात पूर्ण केले. हैदराबादने १८.२ ओव्हरमध्ये विजयी आव्हान पूर्ण केले. हैदराबादचा हा या मोसमातील चौथा विजय ठरला. हैदराबादने हा विजय मिळवत लखनौला या स्पर्धेतून बाहेर केले. लखनौ या स्पर्धेतून बाहेर पडणारी पाचवी टीम ठरली. त्यामुळे आता प्लेऑफच्या एका जागेसाठी मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिट्ल्स यांच्यात थेट लढत पाहायला मिळणार आहे.

ओपनर अभिषेक शर्माने हैदराबादच्या विजयात सर्वाधिक धावांचे योगदान दिले. अभिषेकने २० बॉलमध्ये ६ सिक्स आणि ४ फोरसह ५९ रन्स केल्या. अथर्व तायडेने १३, ईशान किशनने २८ चेंडूत २ षटकार आणि ३ चौकारांच्या मदतीने ३५ धावांचे योगदान दिले. हेनरिक क्लासेनने २८ बॉलमध्ये ४७ रन्स केल्या. कामिंदू मेंडीस ३२ रन्स करुन रिटायर्ड हर्ट झाला तर अनिकेत वर्मा आणि नितीश कुमार रेड्डी या दोघांनी प्रत्येकी नाबाद ५-५ धावा करत हैदराबादला विजयापर्यंत पोहचवले.

त्याआधी हैदराबादने टॉस जिंकून लखनौला बॅटिंगसाठी भाग पाडले. लखनौने ७ विकेट्स गमावून २०५ धावा केल्या. लखनौसाठी मिचेल मार्श आणि एडन मारक्रम या सलामी जोडीने सर्वाधिक धावा केल्या तर मधल्या फळीत निकोलस पूरन याने निर्णायक खेळी केली. मार्शने ३९ बॉलमध्ये ६५ रन्स केल्या तर एडन मारक्रम याने ३८ बॉलमध्ये ६१ रन्स केल्या. पूरनने २६ चेंडूत ४५ धावा केल्या. तर इतरांना दुहेरी आकड्यापर्यंतही पोहोचता आले नाही.

आता २१ मे रोजी मुंबईविरुद्ध दिल्ली यांच्यात होणा-या सामन्याकडे क्रिकेट चाहत्यांचे लक्ष असणार आहे. दोन्ही संघांचा हा या मोसमातील १३ वा सामना असणार आहे. मुंबईच्या खात्यात १४ आणि दिल्लीच्या खात्यात १३ पॉइंट्स आहेत. त्यामुळे मुंबईने हा सामना जिंकला तर ते प्लेऑफसाठी क्वॉलिफाय करतील. मात्र दिल्लीला मुंबई आणि त्यानंतर २४ मे रोजी पंजाबविरुद्ध अशा दोन्ही सामन्यांमध्ये जिंकावे लागणार आहे.

# कृषी कर्ज पुरवठ्यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बँकांना ताकीद

## कृषी कर्ज पुरवठ्यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बँकांना ताकीद

**● मुंबई | वीरभूमी –**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे आज 'राज्यस्तरीय बँकर्स समितीची १६७वी बैठक' संपन्न झाली. यावेळी राज्याचा सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाचा ४४,७६,८०४ कोटींचा पतपुरवठा आराखडा मंजूर करण्यात आला. याप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शेतकऱ्यांना कृषी कर्जाचा पुरवठा झाला नाही, तर त्याचे दुष्परिणाम अर्थव्यवस्थेसोबतच शेतकरी आत्महत्यांमध्ये होतात. त्यामुळे शेतकऱ्यांना सिबिल स्कोअर मागू नका, हे वारंवार सांगितले, तरी बँका सिबिल स्कोअर मागतात. यापूर्वी अशा बँकांवर शासनाने एफआयआर सुद्धा केलेले आहेत. हा विषय गांभीर्याने घ्यावा लागेल. रिझर्व्ह बँकेनेसुद्धा कृषी कर्जाबाबत स्पष्टता दिली आहे. जर कोणती बँक शाखा सिबिल स्कोअर मागत असेल, तर त्या शाखेवर कारवाई करण्यात येईल, अशा स्पष्ट शब्दात मुख्यमंत्री फडणवीस यांनी बँकांना ताकीद दिली. तसेच कृषी कर्ज पुरवठा वाढवण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकांनी विशेष प्रयत्न करून यंदाच्या वर्षी दिलेले उद्दिष्ट पूर्ण करावे, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज दिल्या.

महाराष्ट्र हे देशातील आघाडीचे राज्य असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, शेतकरी हा राज्याचा कणा असून, कृषी व्यवसाय हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा भाग आहे. राष्ट्रीयकृत बँकांनी कृषी कर्ज पुरवठा वाढवण्यावर भर द्यावा. चांगला पाऊस झाला की कृषी विकासदर चांगला असतो. याचा लाभ बँकांनी ही घ्यावा आणि शेतकऱ्यांनाही द्यावा. कृषी क्षेत्रामध्ये किमान ५,००० कोटी प्रतिवर्षी गुंतवणुकीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कृषी क्षेत्र आता फक्त सहाय्यक आणि पुनर्वसनात्मक असणार नाही, तर एक व्यवसाय म्हणून त्याकडे पाहण्यात येईल. यामध्ये बँकांनी त्यांची भूमिका पार पाडावी. शेतकऱ्यांसाठी योजनांमध्ये चांगले काम करणाऱ्यांना सन्मानित करण्याचे धोरण ठरवावे, जेणेकरून आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा मिळेल आणि जे चांगले काम करणार नाही, त्यांची नावे घ्या, त्यांच्यावर पुढच्या बैठकीत नाराजीची नोंद व्यक्त करा, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ऋझज महाराष्ट्रात मोठ्या संख्येने आहेत. कृषी क्षेत्राच्या विकासामध्ये ते महत्वाची भूमिका बजावू शकतात. गडचिरोलीवर अधिक लक्ष केंद्रीत करावे. त्याठिकाणी उद्योगांचे जाळे तयार होते आहे. बँकांनी त्यांचे प्राधान्यक्रम सरकारच्या सोबतीने ठरवल्यास, समग्र विकास होईल. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना अंमलात आणणे ही बँकांची सुद्धा जबाबदारी आहे. त्यातूनच आर्थिक सर्वसमावेशकता साधली जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्याच्या मुख्य सचिव, राज्यस्तरीय बँकर्स समितीचे अध्यक्ष, वरिष्ठ अधिकारी व विविध बँकांचे सदस्य तसेच सर्व विभागांचे सचिव, अधिकारी उपस्थित होते.

### गृहनिर्माण धोरणाचा सर्वंकष आराखडा मंत्रिमंडळ बैठकीत सादर करावा

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे 'राज्य गृहनिर्माण धोरण – २०२५' संदर्भात सादरीकरण बैठक संपन्न झाली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमक्ष गृहनिर्माण धोरणासंदर्भात सादरीकरण करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गृहनिर्माण धोरणाच्या माध्यमातून 'सर्वांसाठी घरे' या संकल्पनेला प्रत्यक्ष अंमलबजावणीत आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. हे धोरण सर्वसमावेशक असणार असून ज्येष्ठ नागरिक, नोकरदार महिला, विद्यार्थी आणि औद्योगिक कामगार अशा विविध समाजघटकांचा समावेश यात करण्यात आला आहे. राज्यातील वाढते शहरीकरण आणि घरांची वाढती मागणी लक्षात घेता, सर्व समाजघटकांसाठी सुरक्षित व परवडणारी घरे या धोरणाच्या माध्यमातून उपलब्ध होतील. प्रस्तावित गृहनिर्माण धोरणाचा सर्वंकष आराखडा मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

## SPOT NEWS

### डॉ. सान्वी गोरे हिचे एम. डी. परीक्षेत यश

**● पाथर्डी । वीरभूमी–**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक यांनी एम. डी. परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर केला. शहरातील डॉ. सान्वी भाऊसाहेब गोरे हिने एम. डी. मेडिसीन परीक्षेमध्ये उज्ज्वल यश मिळवत टिळक मेडिकल कॉलेज पुणे येथे तिने प्रथम रँक प्राप्त केली आहे. तिची आई सौ. सुनिता गोरे गृहिणी असून आदर्श शिक्षक भाऊसाहेब गोरे यांची ती कन्या आहे. तिचे प्राथमिक शिक्षण अगदी दुर्गम डोंगराळ भागातील भांडेवाडी च्या जिल्हा परिषद शाळेत झाले असून तिने श्रीतिलोक जैन विद्यालयात माध्यमिक शिक्षण पूर्ण केले आहे. शालेय जीवनात शाळेत तिने अनेक स्पर्धा परीक्षा मध्ये देखील यश मिळवले आहे. या यशाबद्दल अनेक मान्यवरांनी तिचे कौतुक केले असून वैद्यकीय क्षेत्रातील रुग्णसेवेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. आमदार मोनिकाताई राजळे, माजी नगराध्यक्ष डॉ. मृत्युंजय गर्जे, नगरसेविका मंगलताई कोकाटे, सामाजिक कार्यकर्ते डॉ. दीपक देशमुख यांनी विशेष अभिनंदन केले आहे.



### गायश्री सांगळे हिला एम. एस. इंडस्ट्रियल इंजीनियरिंग विषयामध्ये पदवी प्रदान

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

बफेलो युनिव्हर्सिटी न्यूयॉर्क या अमेरिकेतील विद्यापीठातून कु. गायश्री सांगळे हिने इंडस्ट्रियल इंजीनियरिंग या विषयांमध्ये एम. एस. यशस्वीरित्या पूर्ण केले असून विद्यापीठाने त्यांना नुकतीच एम. एस. पदवी प्रदान केली आहे. कुमारी गायश्री सांगळे ही शिबलापूर (ता. संगमनेर) येथील व्यावसायिक बाळासाहेब सांगळे यांची कन्या असून आश्वी (ता. संगमनेर) परिसरातील जुन्या पिढीतील डॉ. कै. भागवत सांगळे यांची नात आहे. तिचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आश्वी येथील शाळेत झाले असून ग्रामीण भागातून शिक्षण घेऊनही तिने परदेशातून एम. एस. पर्यंतच्या शिक्षणाचा खडतर प्रवास केलेला आहे. त्यामुळे तिच्या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



### श्रीगोंदा तालुक्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा तालुक्यात अनेक ठिकाणी वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडला. सोमवारी श्रीगोंद्याचा आठवडी बाजार होता. दिवसभर उकाड्याने नागरिक हैराण झाले होते. दुपार ३ वाजेनंतर वादळी वारे व विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली. यामुळे बाजारकरूंची व विक्रेत्यांची प्रचंड हाक झाले. गेल्या आठ दिवसांपासून तालुक्यात राज कुठेना कुठे पाऊस होत आहे. त्यामुळे एकीकडे शेतकऱ्यांची चिंता मिटली तर दुसरीकडे साठवण करण्यासाठी ठेवलेला कांदा झाकण्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ झाली. यात अनेकजणांचे काढून ठेवलेला कांदा भिजल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले.

# पाथर्डीत वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस

## जनजीवन विस्कळीत । अनेक झाडे उन्मळून पडली । अनेक घरांमध्ये दुकानांमध्ये पाणी शिरले

**● पाथर्डी । वीरभूमी–**

सोमवारी दुपारी शहर व तालुक्यात झालेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने जनजीवन अस्त व्यस्त होऊन विजेच्या कडकडाटाने भीतीदायक वातावरण तयार झाल्याने रस्त्यावर वावरणाऱ्या नागरिकांनी सुरक्षित आधार घेतला. सुमारे तासभर मुसळधार पर्जन्यवृष्टी झाली. या एक तास झालेल्या अवकाळी पावसाने मात्र शहराची पुरती दाणादाण उडाली.

साईनाथनगर, फुलेनगर, नाथनगर, आनंदनगर, शंकरनगर, वामनभाऊनगर या शहरातील सखल भागामध्ये व तळघरातील व्यावसायिकांच्या दुकानांमध्ये पावसाचे पाणी शिरले. उषाताई पतसंस्थेचे अध्यक्ष अमोल बडे यांच्या घरासह अनेक घरात पाणी शिरून नुकसान झाले. शहर व परिसरात झालेल्या मुसळधार पावसाने व वादळाने शेकडो झाडे उन्मळून पडली. यामध्ये खेर्डा रस्ता, चांदगाव, माळेगाव, तनपुरवाडी, हंडाळवाडी, शिरसाठवाडी अशा पट्ट्यात झाडे पडण्याचे प्रमाण जास्त होते. शहरातील रंगारगल्ली व इतर ठिकाणी काही घरांवर झाड पडल्याने मोठे नुकसान झाले. खेडकर हॉस्पिटल जवळ झाड पडल्याने जायभाय वडापाव उपहारगृहाचे व रस्त्यावरील दुचाकीचे मोठे नुकसान झाले. विजांच्या कडकडाटाने वीजपुरवठा तात्काळ खंडित झाला. जुने बस स्थानक परीसर, कसबा विभाग, शेवगाव रस्त्यावर वीज वाहक तारांवर झाडा व फांद्या पडून तारा तुटल्याने बराच काळ वीजपुरवठा बंद होता. पालिकेची भूमिगत गटार योजना शहरासाठी चुकीची ठरल्याने पाणी वाहून जाण्यासाठी पुरेशी जागा नसल्याने घरात व दुकानांमध्ये पाणी शिरते. बंदीस्त नाल्यांची सफाई नाही व सुधारित नळ योजनेसाठी मुख्य रस्त्यासह गल्लीबोळा ठेकेदाराने खोदून ठेवले आहेत मुसळधार पावसाने मातीचे भरावा वाहुन जाऊन शहरातील बहुसंख्य रस्ते चालणे योग्य राहिले नाहीत.






डांगेवाडी साकेगाव, माळीबाभुळगाव, हत्राळ, सैदापूर, तनपुरवाडी, कासार पिंपळगाव अशा पट्ट्यामध्ये वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. काही ठिकाणी छतावरील पत्रे उचकटून नुकसान झाले. साकेगाव परिसरात व शहरात काही ठिकाणी शेतातील सोलर प्लेट वादळामुळे उडून इतरत्र पडल्या शहरातील दोन्ही नद्यांचा संगम खोलेश्वर मंदिर परिसरात होतो तेथे नदीला पाणी वाढले होते. जुन्या बस स्थानकामध्ये तर गुडघाभर पाणी साचून प्रवाशांची मोठी तारांबळ उडाली. पाणी निचरा होणारी यंत्रणा अत्यंत कुचकामी असल्याने पालिकेचेही भांडे फुटले आहे पहिल्या पावसात शहराची अशी अवस्था झाली आता येणाऱ्या काळात पावसाळ्याचे चार महिने कसे होणार अशी चिंता शहरवासीयांना लागली आहे. उन्हाळी बाजरी, कांदा, आंबे, भाजीपाला याचे मोठे नुकसान होऊन पावसाचा केंद्रबिंदू शहरापासून दहा-बारा किलोमीटरच्या परिसरातच राहिला अनेक फ्लेक्स बोर्ड खाली कोसळून पडले. तालुक्यातील निवडूंगे येथे कडूचंद घोडके यांच्या गोठ्यापुढे बांधलेली म्हैस वीज पडून मरण पावली. कोपरे येथे शेतकऱ्यांच्या चार शेळ्या दगावल्या. शेतकरी मात्र बालबाल वाचला. तालुक्यात वादळ वाऱ्याने कोठे नुकसान झाले याची माहिती महसूल यंत्रणांकडून घेण्यास प्रारंभ केल्याचे तहसीलदार डॉ. उद्धव नाईक म्हणाले. सायंकाळी साडेसातच्या सुमारास हलक्या स्वरूपाचा पाऊस पुन्हा सुरू झाल्याने तत्पूर्वीच ढगांच्या गडगडाटाने बाजारपेठ पूर्णपणे बंद झाली. वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक सायंकाळपर्यंत शहराचा वीजपुरवठा सुरळीत केला. अवकाळी पावसाने यंदा उन्हाळ्यातच ग्रामीण भागामध्ये तलावांमध्ये पाणी साठवून बरेच बंधारे भरले आहेत मे महिन्यामध्ये पावसाळा सदृश वातावरणाने शेतकरी सुद्धा चक्रावून गेला आहे. वादळ, अवकाळी मुसळधार पाऊस व प्रचंड उकाडा यामुळे नागरिक पुरते हैराण झाले.

### स्नेहलताताई कोल्हे यांच्या प्रयत्नांने कोपरगाव तालुक्यातील पाणीटंचाईग्रस्त गावांना दिलासा

**● कोपरगाव । वीरभूमी–**

कोपरगाव तालुक्याच्या पूर्व भागातील दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली होती. आपेगाव, गोधेगाव, घोयेगाव, धोत्रे, तळेगाव मळे या गावांतील विहिरी आटल्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते.



या गंभीर परिस्थितीची दखल घेत मा.आ.सौ. स्नेहलताताई कोल्हे यांनी तातडीने पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून गोदावरी डाव्या कालव्याच्या लाभक्षेत्रातील कोळ नदीवरील घोयेगाव-गोधेगाव साठवण बंधारा भरून घेण्यासाठी विशेष पाठपुरावा केला. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे संबंधित साठवण बंधाऱ्यात गोदावरी डाव्या कालव्यातून पाणी सोडण्यात आले.

या उपक्रमामुळे आपेगाव, गोधेगाव, घोयेगाव, धोत्रे, तळेगाव मळे या गावांमध्ये पाणीपुरवठा योजनांना चालना मिळाली असून, पिण्याच्या पाण्याचा बिकट प्रश्न सुटला आहे. पिण्याच्या पाण्यासाठी होणारी धावपळ थांबली असून ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

या कार्याबद्दल संबंधित गावांच्या ग्रामपंचायती व नागरिकांनी मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांचे मनःपूर्वक आभार मानले असून, त्यांच्या तत्पर व लोकहितवादी कार्याचे कौतुक केले आहे.

### गौरी शुगरकडून ऊस तोडणी व वाहतुकीची तयारी सुरू

**सन २०२५-२६ हंगामाची तयारी । व्यवस्थापक रोहीदास यादव यांची माहिती**

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

ओंकार शुगर ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव बोत्रे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीगोंदा तालुक्यातील हिरडगाव येथील गौरी शुगर अँड डिस्टलरी कारखान्यामध्ये गाळप हंगाम २०२५-२६ साठी ऊस तोडणी आणि वाहतुकीच्या तयारीला सुरुवात झाली आहे. याबाबत कारखान्याचे व्यवस्थापक रोहीदास यादव यांनी माहिती दिली.



गौरी शुगरने या हंगामासाठी ४०० वाहन टोळ्या, २५० ट्रॅक्टर जुगाड, १०० टायर गाड्या आणि १० हार्वेस्टर मशीन यांचे करार करण्याचे नियोजन केले आहे. जे ऊस वाहतूकदार वेळेवर करार करतील, त्यांना प्राधान्य देण्यात येईल. त्यामुळे ऊस वाहतूकदारांनी कारखान्याशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. मागील गाळप हंगामाप्रमाणे यावर्षीही कारखाना पूर्ण क्षमतेने कार्यरत राहून शेतकरी, वाहतूकदार आणि कामगार यांना न्याय देणार आहे. यासाठी कारखाना व्यवस्थापन मंडळाने सर्व तयारी पूर्ण केली आहे. गाळप हंगाम २०२४-२५ मध्ये श्रीगोंदा, शिरूर, कर्जत, जामखेड, दौंड, आष्टी आणि करमाळा येथील ऊस उत्पादक शेतकरी, ऊस तोडणी व वाहतूक कंत्राटदार, अधिकारी आणि कामगार यांनी मोलाचे सहकार्य केले. बाबुराव बोत्रेपाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ऊसाला चांगला भाव देण्यात आला.

या प्रसंगी कारखान्याचे शेतकी अधिकारी, ऊसपुरवठा अधिकारी, सर्व विभागांचे प्रमुख, कर्मचारी आणि तोडणी-वाहतूक कंत्राटदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगरमध्ये वैद्यकीय महाविद्यालयाच्या निर्मितीसाठी खा. लंके आक्रमक

## जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन । वैद्यकीय महाविद्यालय नगर शहरातच होणार अन्यथा संघर्ष : खा. निलेश लंके

**● अहिल्यानगर । प्रतिनिधी–**

केंद्र सरकारने नुकतेच मंजूर केलेले वैद्यकीय महाविद्यालय नगर शहरातच व्हावे, यासाठी महाविकास आघाडीचे खासदार निलेश लंके यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. नगर शहर उपेक्षित राहू नये यासाठी, वैद्यकीय महाविद्यालय शिर्डी येथे हलवले गेले तर आपण उपोषणास बसू, असा थेट इशाराच त्यांनी दिला आहे. आज नगरमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत लंके यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, नगर शहर हे जिल्ह्याचे मुख्यालय असून येथे वैद्यकीय शिक्षण व उपचारासाठीची संपूर्ण पायाभूत सुविधा आहे. जिल्हा रुग्णालय, दळणवळणाची सुलभता आणि केंद्रस्थानी असलेले स्थान यामुळे वैद्यकीय महाविद्यालय येथेच व्हायला हवे.

यावेळी युवा सेनेचे राज्य सहसचिव विक्रम राठोड, नगरसेवक योगीराज गाडे, प्रा. सिताराम काकडे, रामेश्वर निमसे, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख जाधव यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. शिर्डीला विरोध, विखेंना सूचक टोला लंके यांनी शिर्डी येथे मेडिकल कॉलेज व्हावे यासाठी सुरू असलेल्या हालचालींवर नाराजी व्यक्त करत, सत्तेचा गैरवापर करून प्रकल्प दुसऱ्या तालुक्यात वळवण्याचा प्रयत्न चालू असल्याचा गंभीर आरोप केला. त्यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे नाव न घेता, सूचक इशारा देत म्हटले की, हे प्रकल्प स्थानिक जनतेच्या गरजांनुसार असले पाहिजेत, व्यक्तिगत स्वार्थासाठी नव्हे.

नगर शहरातील उपलब्ध जागांची माहिती, नगर शहरालगत असलेल्या विविध शासकीय जागांचा उल्लेख करत लंके म्हणाले, इंद्रायणी हॉटेलच्या शेजारी सुमारे २५ एकर, विळद येथे कृषी विभागाची ४० एकर जागा, तसेच आरणगाव येथील माजी टीबी सेंटरची जागा - अशा अनेक जागा या प्रकल्पासाठी उपयुक्त ठरू शकतात. या सर्व जागांची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दक्षिण भाग उपेक्षित - पदाधिकाऱ्यांची इच्छाशक्ती अपुरी लंके यांनी यावेळी दक्षिण भागातील राजकीय नेतृत्वावरही नाराजी व्यक्त केली. विविध प्रकल्प व योजना इतर भागात वळवल्या जातात, कारण दक्षिण भागातील पदाधिकाऱ्यांमध्ये एकात्मता आणि इच्छाशक्तीचा अभाव आहे, अशी खंत त्यांनी बोलून दाखवली.

जिल्हा विभाजनाची गरज अधोरेखित अहमदनगर जिल्हा हा भौगोलिकदृष्ट्या अत्यंत मोठा असल्याने प्रशासकीय नियोजनासाठी जिल्ह्याचे विभाजन होणे आवश्यक असल्याचे लंके यांनी स्पष्टपणे मांडले. दोन जिल्ह्यांमध्ये विभाजन झाल्यास प्रशासन अधिक प्रभावी होईल, असेही त्यांनी नमूद केले. ढवळपुरी येथील शेळी-मेंढी पालन प्रकल्प देखील उत्तर भागात हलवण्याचा प्रकार अलीकडे घडला असून, तोही अन्यायकारक असल्याचे लंके यांनी सांगितले. या बाबतीत देखील आपण आवाज उठवणार आहोत, असे ठाम वक्तव्य त्यांनी केले.



मुख्यमंत्र्यांना पत्र, केंद्रीय समितीला प्रस्ताव नगरमध्ये वैद्यकीय महाविद्यालय व्हावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवले जाणार असून, केंद्र सरकारच्या समितीला सुद्धा योग्य प्रस्ताव सादर केला जाईल, असे लंके यांनी स्पष्ट केले. खासदार निलेश लंके यांनी वैद्यकीय महाविद्यालयाच्या संदर्भात घेतलेली ही आक्रमक भूमिका, नगर शहराच्या विकासासाठी एक निर्णायक पाऊल ठरू शकते.

# SPOT NEWS

## पल्लवी बोठे यांना सायन्स इन मार्केटिंग इंटेलिजन्स विषयांमध्ये पदवी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**



अमेरिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ सॅन फ्रान्सिसको कॅलिफोर्निया या विद्यापीठातून मास्टर्स ऑफ सायन्स इन मार्केटिंग इंटेलिजन्स या विषयांमध्ये एम. एस. यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. विद्यापीठाने त्यांना नुकतीच एम. एस. पदवी प्रदान केली आहे. श्रीमती पल्लवी बोठे ह्या वाळकी ता. नगर येथील सेवानिवृत्त अप्पर जिल्हाधिकारी नानासाहेब बोठे यांची सून असून निघोज (ता. पारनेर) येथील व्यावसायिक संजय कवाद यांच्या कन्या आहेत त्यांचे माध्यमिक शिक्षण सेंट जोसेफ हायस्कूल मुंबई येथे झाले असून वेलिंकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मुंबई या प्रतिष्ठित संस्थेतून त्यांनी पदवी मिळवलेली होती. त्यांचे पती अनिकेत बोठे यांचे शिक्षण देखील एम. एस. असून ते अमेरिकेतील वॉलमार्ट या कंपनीत सीनियर मॅनेजर म्हणून कार्यरत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती पल्लवी बोठे यांनी शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल पल्लवी बोठे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनाने करा : आ. खताळ

**● संगमनेर । वीरभूमी–**

तालुक्यात गेल्या चार ते पाच दिवसांपासून मान्सून पूर्व वादळ वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांचे व घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्या सर्व नुकसानीचे तातडीने पंचनामे सुरू करावेत, असे निर्देश आमदार अमोल खताळ यांनी महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. संगमनेर तालुक्यात शेतकरी खरीप पूर्व शेतीची मशागत करण्यात गुंतलेला असताना अचानक चार ते पाच दिवसांपासून वादळ वाऱ्यासह अवकाळी पाऊस हजेरी लावत आहे. काही ठिकाणी गारपीट झाली आहे. तर काही ठिकाणी ढगफुटीसदृश्य पाऊस झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाणी साचले आहे. या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या शेतात काढून ठेवलेला कांदा, भाजीपाला, फळपिके,चारापिके यासह वीटभट्ट्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच वादळ वाऱ्यामुळे अनेकांच्या घरावरील पत्रे देखील उडून गेले आहेत. तर काहींची घरे पडली आहे. यामुळे त्यांचा संसार उघड्यावर पडला आहे. त्यामुळे हा मान्सूनपूर्व अवकाळी पाऊस शेतकऱ्यांसाठी फलदायी न ठरता नुकसानकारकच ठरला आहे. या सर्व नुकसानग्रस्त भागातील शेतकऱ्यांचे तसेच घरांचे त्वरित पंचनामे सुरू करावेत, अशा सूचना आमदार अमोल खताळ यांनी महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

## अकोलेत अवकाळीचे थैमान; तीन जनावरांचा वीज पडून मृत्यू

**● अकोले । वीरभूमी–**

तालुक्यात अवकाळी पावसाचे थैमान सुरूच असून सोमवारी अकोले शहर आणि परिसरासह आढळा, प्रवरा खोऱ्यात अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस पडला. यामध्ये मुथाळणे येथे तीन गोवंश जनावरांचा वीज पडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. रविवारी प्रवरा खोऱ्यात ढगफुटीसदृश पाऊस पडला होता. तर काल सोमवारी गणोरे येथे ढगफुटीसदृश पाऊस झाला. दरम्यान समशेरपूर नजीकच्या मुथाळणे येथील कानडवाडीचे शेतकरी संतू पुनाजी करवर यांच्या दोन गायी आणि एक कालवडीचा अवकाळी पावसात वीज पडून मृत्यू झाला आहे.

# आदिवासी भिल्ल समाजाला गावातच घरकुल द्यावे

## एकलव्य संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात व इमामपूर बहिरोबा गावात बेघर आदिवासी भिल्ल समाजाचा सर्वे करून ग्रामपंचायत हद्दीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या जागा आहे. त्यातून भूमिहीन आदिवासी भिल्ल समाजच्या कुटुंबीयांना ग्रामपंचायत हद्दीमध्ये महाराष्ट्र शासनाची जागा राहण्यासाठी मिळवून द्यावी तसेच जागा नावावर नसल्याने आदिवासी भिल्ल समाजाच्या कुटुंबीयांना घरकुलाचा लाभ देखील घेता येत नसल्याने जागा नावावर करून देण्याच्या मागणीसाठी एकलव्य संघटनेचे महाराष्ट्र संघटक मोहन गोलवाड, महाराष्ट्र संघटिका वैजयंता गोलवाड व नाशिक सभापती शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देताना जिल्हाप्रमुख एकनाथ भरडे, गोरख ठाकर, राजू ठाकर, आकाश ठाकर, भाऊसाहेब बर्डे, राजू बर्डे, शुभम पवार, गणेश पवार, किरण बर्डे, अरविंद बर्डे, संगीता ठाकर आदीसह बेघर कुटुंबीय उपस्थित होते.



पुढे निवेदनात म्हटले आहे की, आदिवासी भिल्ल समाजाचे इमामपूर बहिरोबा मळा येथे अनेक कुटुंबीय असून त्यांच्या नावे कोणत्याही गावांमध्ये शेतजमीन अथवा घर बांधण्यासाठी जागा नावावर नाही तसेच त्यांची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने जागा विकत घेता येत नाही व उदरनिर्वाहासाठी कोणतेही साधन नसल्याने अनेक वेळा उपाशी राहावे लागते त्यामुळे इकडे तिकडे भटकंती करावी लागत असून दिवसातून एक वेळा जेवले की दुसरी वेळ उपाशी राहावे लागते.

त्यामुळे या कुटुंबीयांना घरकुलाचा देखील लाभ भेटत नाही. त्यामुळे जागा नावावर करून देण्यासाठी जीआर काढण्यात यावा व देशाचा आदिवासी देशाचा मालक असून त्यांना जागा राहण्यापूर्ती देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली असून आदिवासी भिल्ल समाजाच्या कुटुंबीयांचे सर्वे करून जागा अथवा गावातील महाराष्ट्र शासनाची जागा नावावर करण्यात यावी व घरकुलाचा लाभ देण्यात यावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## मान्सूनपूर्व पाऊस नुकसानी बाबत शेतकऱ्यांना तातडीने मदत करा : किसान सभा

**● अकोले । वीरभूमी–**

राज्यभर मान्सूनपूर्व अवेळी पावसाने शेतीचे, शेती पिकांचे व शेतजमिनीचे अतोनात नुकसान होत आहे. खरीप पूर्व मशागतीची कामे यामुळे संपूर्णपणाने वाया गेली असून फळबागा, भाजीपाला व इतर उभ्या पिकांना पावसाचा मोठा फटका बसला आहे. कमी वेळामध्ये अधिक पाऊस पडत असल्यामुळे शेतजमिनी व बांधबंधिस्ती अनेक ठिकाणी वाहून जात आहे. राज्य सरकारने या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्याची आवश्यकता आहे.

राज्यात खरीप हंगामाची तयारी करण्यात शेतकरी गुंतला असताना शेतकऱ्यांवर व शेतीवर ओढवलेल्या या संकटामुळे हंगाम धोक्यात येण्याची शक्यता आहे. राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. मान्सूनपूर्व होत असलेल्या या अतिवर्षणाचा खरीप हंगामावर काय परिणाम होऊ शकतो व त्यावर काय उपाययोजना केल्या पाहिजेत याबाबत कृषी विद्यापीठे व कृषी तज्ञ यांनी सजगपणाने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे.

राष्ट्रीय आपत्ती सहायता निधी अंतर्गत शेतकऱ्यांना मदत करण्याची कारवाई राज्य सरकारने तातडीने सुरू केली पाहिजे. केंद्र सरकारने याबाबत राज्य सरकारच्या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद तातडीने दिला पाहिजे व आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत केली पाहिजे. राज्य व केंद्र सरकारने याबाबत तातडीने पावले उचलावीत अशा प्रकारचे आवाहन अखिल भारतीय किसान सभा करत आहे.

राज्य सरकारने पीक विमा योजनेमध्ये केलेल्या बदलाचा अत्यंत वाईट परिणाम शेतकऱ्यांवर होणार आहे. शेतकऱ्यांना ज्या तरतुदी अंतर्गत सर्वाधिक भरपाई मिळत होती त्या प्रमुख चार तरतुदी राज्य सरकारने पीक विमा योजनेतून काढून टाकल्या आहेत. राज्य सरकारने कृषी योजना व पीक विम्याचे पैसे लाडक्या योजनांकडे वळवण्याचा घाट घातला असून पीक विमा योजनेतील बदल त्याचीच फलनिष्पत्ती आहे. राज्य सरकारने येऊ घातलेले संकट पाहता पीक विमा योजनेत केलेले बदल मागे घ्यावेत व शेतकऱ्यांना अधिक सहाय्यभूत होतील अशा प्रकारचे बदल करून सक्षम पीक विमा योजना राज्यात राबवावी अशी मागणीही किसान सभेच्या वतीने डॉ. अशोक ढवळे, जे. पी. गावीत, उमेश देशमुख, डॉ. अजित नवले यांनी केली.

# अटींचा भंग केल्याने न्यायालयाकडून कर्जदाराचा अटकपूर्व जामीन रद्द

## नगर अर्बन बँक आर्थिक गैरव्यवहार प्रकरण

**● नगर । वीरभूमी–**

नगर अर्बन बँकेच्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात येथील जिल्हा न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय देताना संशयित आरोपी कर्जदार सुशिल घनशाम अगरवाल याचा अटकपूर्व जामीन रद्द केला आहे. या प्रकरणात आर्थिक फसवणूक झाल्याचा ठपका ठेवण्यात आला असून, संचालक, कर्मचारी आणि कर्जदारांविरूध्द न्यायालयात खटला सुरू आहे. सदर खटल्याचे कामकाज जिल्हा न्यायाधीश एम. एच. शेख यांच्या न्यायालयात सुरू आहे. न्यायालयाने आधी दिलेल्या जामिनाच्यावेळी दिलेल्या अटींचा संबंधितांने भंग केल्याने न्यायालयाने त्याचा अटकपूर्व जामीन रद्द केला आहे.




अगरवाल याने अटकपूर्व जामीनासाठी जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला होता. अर्जाच्या सुनावणीदरम्यान, त्याने संपूर्ण कर्जाची रक्कम भरण्याची तयारी दर्शविली होती. त्यामुळे न्यायालयाने विश्वास ठेवून त्याला अटकपूर्व जामीन मंजूर केला. मात्र, न्यायालयाने घालून दिलेल्या अटीप्रमाणे एक महिन्याच्या आत अवसायकांशी थेट चर्चा करून रक्कम परतफेड करणे आवश्यक होते. पण, अगरवाल याने ठरलेला कालावधी उलटूनही कोणताही संपर्क साधला नाही. त्यानंतर देखील अगरवाल याने वेगवेगळ्या कारणांनी मुदत मागत केस लांबवत ठेवली. त्याचबरोबर अवसायकांनी एकरकमी परतफेड योजनेचा लाभ मिळावा म्हणून अनेकवेळा पत्रव्यवहार केला.

मात्र, प्रत्यक्ष कृती न करता अगरवाल याने वेळकाढूपणा चालवला. यामुळे फिर्यादीने जामीन रद्द करण्यासाठी अर्ज दाखल केला. सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाचे वकील ॲड. एम. व्ही. दिवाणे यांनी उच्च न्यायालयात दाखल झालेल्या रिव्हीजन अर्जासंबंधी रोजनामाही सादर केला.

त्यामध्ये कोणताही अंतिम निर्णय झालेला नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. हे लक्षात घेता, अगरवाल याने जामीन मिळाल्यानंतर अटींचा भंग केला असून, त्यांचे न्यायालयासमोरील वर्तनही योग्य नसल्याचे न्यायालयात नमूद केले. या पार्श्वभूमीवर, न्यायालयाने सुशिल अगरवाल याचा अटकपूर्व जामीन रद्द करण्याचा निर्णय दिला. या खटल्यात फिर्यादी व ठेवीदारांकडून ॲड. पिंगळे यांनी काम पाहिले.

# अकोले तालुकातील सात जि. प. गटात शिवसेनेची कार्यकारीणी जाहीर

**● अकोले । वीरभूमी –**

शिवसेना पक्षाच्या उपजिल्हा प्रमुखपदी उपसभापती मारुती देवराम मेंगाळ,तालुका प्रमुखपदी जिल्हा फेडरेशनचे संचालक सुशांत शांताराम गजे, कार्याध्यक्ष पदी अमृतसागर दूध संघाचे संचालक जगन देशमुख, सचिवपदी रोहिदास किसन जाधव, सहसचिवपदी सुभाषराव सोपान येवले, उपतालुका प्रमुखपदी हर्षल नितीन वाकचौरे यांची निवड करण्यात आली असून नियुक्ती पत्रक आज मुंबई येथे बाळासाहेब ठाकरे भवन येथे शिवसेना पक्षाचे सचिव संजय भाऊराव मोरे यांच्या हस्ते देण्यात आले.

अकोले विधानसभा मतदारसंघातील पक्ष संघटना मजबूत करण्याच्या दृष्टीने ही कार्यकारणी तयार करण्यात आली असून या मध्ये सात जिल्हा परिषद गटांमध्ये सात उपतालुका प्रमुखांची निवड करण्यात आली आहे.

या मध्ये उपतालुका प्रमुख गणेश एकनाथ पापळ (जिल्हा परिषद गट धामणगाव आवारी), शिवाजी गंगाधर पाटोळे (जिल्हा परिषद गट देवठाण), भाऊसाहेब जालिंदर हगवणे (जिल्हा परिषद गट समशेरपूर), विशाल गोंदके (जिल्हा परिषद गट सातेवाडी), संजय भानुदास गोडसे (जिल्हा परिषद गट कोतुळ), विक्रम बाळासाहेब जगदाळे (जिल्हा परिषद गट राजूर), संदीप शंकरराव आहेर (जिल्हा परिषद गट बोटा) यांच्या निवडी करण्यात आल्या.

धामणगाव आवारी गट प्रमुख– प्रकाश केरु पाचपुते, फपाध्यक्ष नामदेव मोहन मधे, सचिव– गोविंद दादाभाऊ झोळेकर, कार्याध्यक्ष– विलास भागवत काळे, सहसचिव– नाथ भिका भोर.

देवठाण जिल्हा परिषद गट– गटप्रमुख– रामदास अण्णा आंबरे, उपाध्यक्ष – आनंद किसन गिऱ्हे, कार्याध्यक्ष– दत्ता कारभारी बंदावणे, सचिव– तुकाराम आनाजी मेंगाळ, सहसचिव– अनिल बबन माने. बोटा जिल्हा परिषद गट – गटप्रमुख संतोष शिवराम देवकर, उपाध्यक्ष– ज्ञानेश्वर गणपत सुपेकर, कार्याध्यक्ष– सुनिल सखाराम गडगे, सचिव– नंदू रामचंद्र कान्होरे, सहसिचव– छगन तुकाराम केदार. राजूर जिल्हा परिषद गट – गटप्रमुख – पुनाजी मधुकर ढगे, उपाध्यक्ष– मच्छिंद्र देवराम कोकतरे, कार्याध्यक्ष– अर्जुन खोडके (लव्हाळावाडी), सचिव– गंगाराम खडके (घाटघर), सहसचिव– प्रकाश उघडे (पांजरे).

समशेरपूर जिल्हा परिषद गट – गटप्रमुख– भाऊसाहेब बिन्नर (केळी रु वाडी), उपाध्यक्ष– विकास जाधव (कोकणवाडी), कार्याध्यक्ष– भरत वाळीबा मेंगाळ, सचिव– बाळासाहेब मारुती डगळे, सहसचिव– मधुकर गणपत मेंगाळ. सातेवाडी जिल्हा परिषद गट– गटप्रमुख– अरुण किसन गोंदके (करंडी), उपाध्यक्ष– योगेश चौधरी (अंभोळ), कार्याध्यक्ष– वैभव निवृत्तीन गोंदके, सचिव– राम जाधव (मवेशी), सहसचिव– सोमनाथ भोजने (अबितखिंड).

कोतूळ जिल्हा परिषद गट – गटप्रमुख– रुपेश मच्छिंद्र देशमुख, उपाध्यक्ष– सोमनाथ भाऊ चौधरी (लहित), कार्याध्यक्ष– मच्छिंद्र मधे (नाचणठाव), सचिव– सुभाष गायकर (ब्राम्हणवाडा), सहसचिव– रमेश कडाळे (पांगरी). अकोले शहर प्रमुख– सचिन संदीप शेटे, उपाध्यक्ष– गणेश भागूजी कानवडे, कार्याध्यक्ष जावेद राशिद जहागिरदार, सचिव– सचिन सुनील भालेराव, सहिसचिव– वाल्मीक राजेंद्र मैड. युवा सेना अकोले तालुका प्रमुख– दिपक सोमनाथ कासार, तालुका कार्याध्यक्ष– महेश बाळासाहेब कोकतरे, उपतालुका प्रमुख– नितीन रामनाथ पाडेकर, तालुका सचिव– अजय शिवाजी उघडे, तालुका सहसचिव– अजय नंदू भांगरे.

शिवसेना पक्ष तालुका सोशल मीडिया समिती अध्यक्ष– रोशन माधव जाधव, उपाध्यक्ष– सार्थक दौलत म्हस्के, कार्याध्यक्ष– सुरेंद्र नवनाथ दिघे, सचिव– प्रवीण सखाराम गावंडे, सहसचिव– सुनिल गंगाधर भांगरे यांच्या निवडी करण्यात आल्या आहेत.

वरील सर्व शिवसेना पक्षाच्या अकोले विधानसभा मतदारसंघातील पदाधिकाऱ्याच्या निवडी शिवसेना पक्षाचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने शिवसेना पक्षाचे सचिव संजय भाऊराव मोरे यांच्या हस्ते या निवडी करण्यात आल्या आहेत.

## उद्या शेवगावात भव्य तिरंगा पदयात्रा

**● शेवगाव । वीरभूमी–**

ऑपरेशन सिंदूरच्या यशस्वी कारवाईच्या अनुषंगाने भारतीय लष्कराच्या समर्थनार्थ सर्व राष्ट्रप्रेमी नागरीकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने बुधवार २१ मे २०२५ रोजी शेवगांव येथे भव्य तिरंगा पदयात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या तिरंगा पदयात्रेची सुरुवात सकाळी ८.०० वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून होणार आहे.

पहलगाम येथील भारतीय पर्यटकांवर दहशतवादी हल्ला होवून त्यात २७ निष्पाप पर्यटक मारले गेले, या कृत्यामुळे संपूर्ण भारतात पाकिस्तान व आंतकवादी कृत्यांच्या विरोधात तीव्र संतापाची लाट होती. या कृत्याचा बदला म्हणून भारतीय नेतृत्व व लष्कराने ऑपरेशन सिंदूर यशस्वी राबवून पाकिस्तानातील दहशतवादी तळाचा नायनाट करुन, पाकिस्तानच्या संरक्षण दृष्टया महत्वाच्या ठिकाणी हल्ले करुन त्यांचे मोठे नुकसान केले. भारतीय संरक्षण दलाच्या या गौरवपूर्ण कामगिरीच्या सन्मानार्थ संपूर्ण भारतभर भव्य तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात येत आहे.

ऑपरेशन सिंदूर या लष्करी मोहिमेत भारतीय लष्कराने आपल्या सामरिक क्षमतेचे दर्शन घडवित भारत देश दहशतवादा विरूध्द किती आक्रमक भूमिका देऊ शकतो असे जगाला दाखवून दिले. एक भारतीय म्हणुन या तिरंगा पदयात्रेत सहभागी होऊन एकतेचे दर्शन घडवूया आणि सीमेवरील सैनिकांचे मनोबल वाढवूया असे आवाहन आयोजकांकडून नागरिकांना करण्यात आले आहे.

या तिरंगा पदयात्रेत सर्व राष्ट्रप्रेमी, सामाजिक संस्था, समविचार संस्था, व महिला सहभागी होणार आहेत. या तिरंगा पदयात्रेच्या वेळी शहीद जवान स्मारक, किंवा हुतात्मा स्मारक यांना श्रध्दाजली अर्पण करुन, देश भक्तीच्या घोषणा, देश भक्तीपर गीते लावून, हम सेना के साथ है, ऑपरेश सिंदूर के साथ राष्ट्र, असे बॅनर लावून आपल्या वीर जवानांना अभिवादन करण्यात येणार आहे.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

वीरभूमी

# राष्ट्रीय महामार्ग श्रीगोंदा, आढळगाव हद्दीत का रखडला?

## रखडलेल्या कामाचे मूळ कोणीच शोधेना ! सर्वसामान्य जनतेला दाद कुणाकडे मागायची ही विवंचना

■ **विजय उंडे**

● **श्रीगोंदा । वीरभूमी –**

राष्ट्रीय महामार्ग ५४८ डीच्या महामार्गावरील श्रीगोंदा व आढळगाव बसस्थानक, श्रीगोंदा-कर्जत सीमेवरील भावडी ते पीर फाटा याठिकाणी रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाल्याने परिसरातील नागरीकांची अतोनात कुचंबणा होत असून 'भीक नको पण कुत्रं आवर' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. याबाबत प्रशासन, लोकप्रतिनिधी, ठेकेदार यांनी मिठाची गुळणी घेतल्याने सर्वसामान्य जनतेला दाद कुणाकडे मागायची ही विवंचना तयार झाली आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ डी हा रस्ता पुणे जिल्ह्यातील तळेगाव दाभाडे ते लातूर जिल्ह्यातील अहमदपूर पर्यंत सुमारे ३९२ किलोमीटर अंतरातील विकासापासून काहीसा मागे राहिलेल्या मराठवाड्याला जोडणारा प्रमुख मार्ग आहे. या परिसरातील शेतीमाल, ग्रामीण कुटीर उद्योग, छोट्या मोठ्या उद्योग व्यवसायांना मुख्य बाजारपेठ मिळण्याचा प्रमुख उद्देश आहे. मात्र या मार्गावरील अनेकाविध कारणांमुळे काही किलोमीटर ते काही मीटरचे अनेक टप्पे अक्षरशः उकरून खड्डेमय, जीवित, आर्थिक हानी पोहोचविणारे झाले आहेत.

श्रीगोंदा तालुक्यातील आढळगाव बसस्थानकासमोरील सुमारे ५०० मीटर अंतराचे काम रखडून ग्रामीण भाषेत कृत्रिम राढा घालून ठेवल्यासारखे केले आहे. याबाबत प्रशासन, ठेकेदार, लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ यांना माहिती विचारली तर कुणालाही ठोस कारणे सांगता येत नाहीत. वेगवेगळी कारणे सांगितली जातात.

आढळगाव येथील बसस्थानकासमोर काही व्यक्तींच्या मालकीच्या जमिनी आहेत. या मालकांचा रस्ता रुंदीकरणाला विरोध आहे, कारण त्यांना योग्य मोबदला मिळाला नाही किंवा भूसंपादन प्रक्रियेत पारदर्शकता नसल्याचा दावा ते करतात. काही जाणकारांकडून अशीही माहिती मिळाली की, काही गाव पुढारी आणि स्वयंघोषित सामाजिक कार्यकर्ते ठेकेदारांकडून पैसे उकळण्यासाठी अडथळे निर्माण करतात. हे लोक स्थानिक समस्यांचा बाऊ करून किंवा काम थांबवण्याची धमकी देऊन ठेकेदाराला त्रास देतात. काही ठिकाणी स्थानिक गुंड ठेकेदारांना उपठेके मिळवण्यासाठी दबाव टाकतात. मुरूम पुरवठा, रस्ता साफसफाई, साइड पट्ट्यांचे काम किंवा मशिनरी ठेवण्यासाठी जागा भाड्याने देणे यासारख्या गोष्टींसाठी ठेकेदारांना



स्थानिक गुंडांशी व्यवहार करावा लागतो. यामुळे ठेकेदारांचा खर्च वाढतो आणि कामाची गती मंदावते.

ठेकेदाराला मोठ्या प्रमाणात काम मिळाल्यावर तो ते काम छोट्या-छोट्या टप्प्यांत उपठेकेदारांना वाटून देतो. मात्र, सर्व बिल स्वतःच्या नावावर काढून ठेकेदार मोठा नफा कमावतो. उपठेकेदारांना कमी पैसे मिळत असल्याने ते निकृष्ट दर्जाचे काम करतात किंवा काम रखडवतात. ठेकेदार जाणीवपूर्वक काम संथगतीने करतात, कारण त्यांचे एकाच वेळी अनेक प्रकल्प सुरू असतात. त्यांच्याकडे संसाधने आणि मनुष्यबळाचा तुटवडा असतो, ज्यामुळे कामाचा लोड वाढतो. त्याचबरोबर ठेका मिळाल्यावर ठेकेदाराला सत्ताधारी नेते, संबधित अधिकारी यांना कमिशन द्यावे लागते. यामुळे ठेकेदारांचा नफा कमी होतो, आणि ते खर्च वसूल करण्यासाठी कामाचा दर्जा कमी करतात किंवा विलंब करतात. त्यातच शासन कोण परवानग्या देत नाही किंवा कोण अडथळे आणत आहे, याबाबत माहिती लपवते. यामुळे स्थानिक नागरिक आणि ठेकेदारांमध्ये गैरसमज निर्माण होतात आणि काम रखडते.

अशीही शक्यता आहे की, स्थानिक नागरिक रुंदीकरणामुळे होणाऱ्या नुकसानीबद्दल (उदा. शेती, घरे) नाराज असतात. त्यांच्या मागण्यांचे निराकरण न झाल्यास ते आंदोलने करतात, ज्यामुळे काम थांबते. रखडलेल्या कामाचे परिणाम म्हणजे अपघात आणि जीवितहानी मोठ्या प्रमाणावर होत आहे. अर्धवट उकरलेले रस्ते आणि अपूर्ण बांधकामांमुळे आढळगाव परिसरातील असंख्य अपघातात २५-३० निष्पाप नागरिकांचा बळी गेला आहे तर शेकडोजण कायमचे अपंग झाले आहे.

मात्र जबाबदारी कोण स्वीकारत नाही राष्ट्रीय महामार्ग ५४८ डीवरील काम रखडण्याची जबाबदारी एकट्या ठेकेदारावर किंवा स्थानिकांवर टाकता येणार नाही. यात शासन, प्रशासन, ठेकेदार आणि समाजातील काही घटकांचा समान वाटा आहे. भ्रष्टाचार आणि कमिशनच्या प्रथेला आळा घालण्यासाठी कठोर कायदेशीर कारवाई करण्याची गरज आहे. ठेकेदाराने निकृष्ट काम आणि जाणीवपूर्वक विलंब टाळावा. उपठेकेदारांना काम देताना दर्जा आणि वेळेची काळजी घ्यावी. स्थानिक नागरिक आणि समाज, स्थानिकांनी वैयक्तिक स्वार्थापेक्षा सामूहिक विकासाला प्राधान्य द्यावे. गाव पुढारी आणि गुंडांनी ठेकेदारांना त्रास देणे थांबवावे तरच हे काम निर्धोक होऊ शकते.

### पुन्हा आंदोलन करावे लागणार का?

■ या अपूर्ण कामासाठी श्रीगोंदा तालुका निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुभान तांबोळी यांनी व गावकऱ्यांनी पाच वेळा उपोषण, रास्तारोको आंदोलने केली आहेत. तर दोनवेळा स्वतः खा. निलेश लंके यांनी ग्रामस्थांची बाजू घेत आक्रमक पवित्रा घेतला आहे. तरीही एकदोन दिवस मशिनरी आणून काम सुरू केल्याचा देखावा केला जात आहे व परत मोठा अपघात झाला तरच पुन्हा ग्रामस्थ आक्रमक होत आहेत.

# आ. आशुतोष काळेंच्या सूचनेनुसार काकडीचे बंधारे भरण्यासाठी दोन दिवसात पाईपलाईन

● **कोपरगाव । वीरभूमी–**

निळवंडे कालव्याच्या पाण्यापासून वंचित राहणाऱ्या काकडी गावचे बंधारे भरून देण्यासाठी आ.आशुतोष काळे यांच्या सुचनेनुसार दोनच दिवसात पाईपलाईनचे काम सुरु करणार असल्याची माहिती पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी काकडी ग्रामस्थांना दिली आहे.

निळवंडे कालव्याच्या पाण्यातून जिरायती भागातील डांगेवाडीच्या बंधाऱ्यात पाणी येत होते व मल्हारवाडीच्या बंधाऱ्यात देखील पाईपलाईनचे माध्यमातून पाणी आले आहे. परंतु काकडी गावातील बंधारे मात्र निळवंडे कालव्याच्या पाण्यातून भरली जात नव्हती. त्याबाबत आ. आशुतोष काळे यांनी जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पा.यांच्याकडे जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत देखील मागणी केली होती. तसेच पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना देखील काकडी येथील भवानी आई बंधारा येथून त्या खालील बंधारे भरण्यासाठी पाईपलाईन बसवण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्या सूचनेची अंमलबजावणी करण्यासाठी सोमवार (दि.१९) रोजी पाटबंधारे विभागाचे उपकार्यकारी अभियंता आसिफ शेख व तुषार मंडलिक यांनी काकडीच्या शेतकऱ्यांसह पाईप लाईन टाकण्यासाठी जागेची पाहणी करून दोनच दिवसात पाईप लाईनचे काम सुरु करणार असल्याचे सांगितले आहे. तसेच मल्हारवाडी येथील डी.वाय. तीन चारीद्वारे सोडलेल्या पाण्यामुळे बंधारे व केटीवेअर भरुन मिळणार असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले असून त्यांनी आ.आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे.

यावेळी बाबासाहेब गुंजाळ, राजेंद्र गुंजाळ, प्रभाकर गुंजाळ, अनिल सोनवणे, योगेश कांडेकर, प्रकाशजी सोनवणे, गजानन सोनवणे, शंकरराव दिघे, बाळासाहेब शिंदे, मधुकर गुंजाळ, पावलस सोनवणे, आप्पासाहेब शिंदे, भाऊसाहेब रोडे, सचिन गुंजाळ, भाऊराव बिबे, साहेबराव गुंजाळ, दत्तू गुंजाळ आदी उपस्थित होते.



कोपरगाव मतदार संघातील एकही गावतळे बंधारा किंवा पाझर तलाव भरण्यापासून वंचित राहणार नाही यासाठी माझा शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. ज्या ज्या गावात गोदावरी कालव्याच्या माध्यमातून किंवा निळवंडे कालव्याच्या माध्यमातून चर किंवा बंद पाईप लाईनच्या माध्यमातून पाणी घेवून जाणे शक्य आहे त्या त्या ठिकाणी पाणी पोहोचवून त्या त्या गावातील गावतळे बंधारा किंवा पाझर तलाव भरण्यासाठी माझे प्रयत्न यापुढेही सुरुच राहतील. काकडी, धोंडेवाडी, जवळके, बहादराबाद या गावातील तसेच बहादरपूर येथील राहिलेल्या काही भागातील बंधाऱ्यात पाणी आणण्यासाठी शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा करत आहे.

**– आ. आशुतोष काळे**

# मस्जिदीवरील भोंगे बंद करुन अवैध कत्तलखाने बंद करण्याची संजय मरकड यांची मागणी

● **पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी तालुक्यातील श्री क्षेत्र मढी येथील सरपंच तसेच श्री कानिफनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संजय मरकड यांनी सकल हिंदू समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना एका पत्राद्वारे अवैध कत्तलखाने बंद करावेत. मस्जिदीवरील भोंगे बंद करावेत व गो हत्या बंदी कायद्याची कडक अंमलबजावणी करावी अशी मागणी केली आहे. अन्यथा २० मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

या निवेदनामध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्रात गोहत्या बंदी कायदा असताना तसेच राज्य शासनाने नुकताच गोमातेला राजमातेचा दर्जा दिला आहे असे असताना देखिल वारंवार हिंदू समाजाच्या आराध्य असणाऱ्या गोमातेची सर्रासपणे कत्तल जिल्ह्यातील विविध ठिकाणी कत्तलखान्यात चालू आहे.

या जिल्ह्यात सर्रासपणे चालू असलेल्या अवैध कतलखान्यांवर तात्काळ बंदी घालण्यात यावी, त्यांना जमीनदोस्त करण्यात यावे तसेच सर्व मस्जिदींवरील भोंगे तत्काळ काढून टाकावेत,

अशी मागणी करत मरकड यांनी स्पष्ट केले की, याप्रकारात स्थानिक पोलीस प्रशासन याकडे डोळेझाक करत दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. त्यांनी अशी मागणी केली की, ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत ही कत्तल होईल त्या ठिकाणच्या संबंधित पोलिस अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करावा.

तसेच आवाजाचे कोणतेही नियम न पाळणाऱ्या मस्जिदींवरील भोंग्यांमुळे होणाऱ्या ध्वनी प्रदूषणासह नागरिकांना होणाऱ्या त्रासापासून मुक्ती मिळावी यासाठी मरकड यांनी आवाज उठवला आहे. कोणतीही अधिकृत परवानगी न घेता दिवसभरात पाच वेळा मोठ्या आवाजात होणाऱ्या अजाण व नमाज पठणामुळे विद्यार्थ्यांचे, शाळा, महाविद्यालय, रुग्णालयातील रुग्ण, तसेच सामान्य जनतेचे रोजचे जीवन विस्कळीत होत असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे त्यांनी सर्व भोंगे काढण्याची मागणी केली आहे.

### संजय मरकड यांचे आजपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

■ निवेदनातील या मागण्या पूर्ण न झाल्यास दि. २० मे रोजी सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरु करण्यात येईल, असा इशारा मरकड यांनी या निवेदनात दिला आहे. तसेच या मागण्या पूर्ण होईपर्यंत उपोषण सुरु राहील आणि या संपूर्ण परिस्थितीची जबाबदारी प्रशासनावर राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. या निवेदनामुळे जिल्ह्यातील वातावरण अधिकच तापण्याची शक्यता असून प्रशासन यावर काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मार्च २०२५ च्या संच मान्यतेला जैसे थे ठेवण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश

## सुनिल पंडित यांची माहिती । शिक्षकांना मोठा दिलासा

● **नगर । वीरभूमी–**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये संच मान्यतेमुळे अनेक शाळांमध्ये शिक्षकांची संख्या शून्यावर गेल्याने संबंधित शिक्षक अतिरिक्त झाले होते. या शिक्षकांनी औरंगाबाद खंडपीठात दाखल केलेल्या याचिकेवर उच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय दिला असून, १५ मार्च २०२५ च्या संच मान्यतेला जैसे थे ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे संबंधित शिक्षकांना त्यांच्या मूळ शाळांमध्येच काम करण्याची परवानगी मिळाली असून, कोणतीही शाळा बंद होणार नाही, हा मोठा दिलासा मिळाला आहे.

याचिकाकर्त्या शिक्षकांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ श्री. अरविंद गोपाळराव आंबेटकर यांनी काम पाहिले. दरम्यान, महाराष्ट्र



राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळाच्या वतीने अ.नगर येथील शिक्षक भवनामध्ये विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत विविध शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळाचे उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित म्हणाले, शिक्षक हे राष्ट्रनिर्माते असतात. प्रशासनाच्या चुकीच्या निर्णयामुळे जर त्यांच्यावर अन्याय होत असेल, तर तो थांबवण्याची जबाबदारी संघटनेची आहे. कोणत्याही शिक्षकावर अन्याय होऊ देणार नाही, यासाठी संघटना सदैव कटिबद्ध आहे. आम्ही शाळा वाचवल्या आहेत, आता शिक्षकांचे हक्कही वाचवणार. त्यांनी यावेळी सर्व शिक्षकांनी एकजूट राहून संघटनेच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे आवाहन केले.

# थकीत मालमत्ता करावरील दंड माफ; थकबाकी वसुलीसाठी अभय योजना

● **नगर । वीरभूमी–**

नगर परिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी क्षेत्रातील थकीत मालमत्ता करावर आकारण्यात येणारा २ टक्के दंड माफ करण्याचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. तसेच थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी अभय योजना लागू करण्यात आली आहे.

नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी क्षेत्रातील मालमत्तांच्या थकीत करांवर दरमहा २ टक्के दंड लावण्याची तरतूद आहे. यामुळे मालमत्ताधारकाच्या एकूण थकबाकीमध्ये वाढ होऊन दंडाची ही रक्कम अनेकदा मूळ कराच्या रकमेपेक्षा अधिक होते. मूळ कराच्या रकमेपेक्षा दंडाची रक्कम अधिक झाल्याने मालमत्ताधारक कर भरण्यास टाळाटाळ करतात. यावर उपाय म्हणून थकीत मालमत्ता करावरील दंड माफ करून अभय योजना लागू करण्यात येणार आहे.

नगरपरिषद हद्दीत राहणाऱ्या नागरिकांची मालमत्ता करावरील शास्ती ५०% पर्यंत कमी करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांचेकडे असणार आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांनी अंतिम निर्णय ३० दिवसाच्या आत घेणे बंधनकारक असल्याचे नमूद आहे. तर ५०% पेक्षा अधिक शास्ती कर माफी हवी असल्यास जिल्हाधिकारी यांनी सदर प्रस्ताव आपल्या अभिप्रायासह आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचलनालयाकडे पाठवायचे आहेत. ५०% हून अधिक शास्ती कर कमी करण्याचा अंतिम निर्णय राज्य शासन घेणार असल्याचे या शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.